**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## गृहविज्ञान विभागातर्फे उद्योजक मेळाव्याचे ७ व ८ सप्टेंबरला आयोजन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभागातर्फे एम.एस्सी. रिसोर्स मॅनेजमेन्टच्या विद्यार्थीनींनी 'कम्युनिटी इव्हेंट मॅनेजमेन्ट' या विषयाच्या प्रात्यक्षिकांतर्गत उद्योजक मेळाव्याचे आयोजन दि. ७ व ८ सप्टेंबर, २०१८ रोजी जोशी सभागृह, श्याम चौक, अमरावती येथे करण्यात आले आहे.

या मेळाव्यामध्ये प्रिझर्व्ह फूड, पौष्टीक पदार्थ, मातीचे गणपती, सेंद्रीय भाजीपाला, फळे, सेंद्रीय खते, पारंपारिक साड्या, कुर्ती, ज्वेलरी, सौंदर्य प्रसाधने, शोभेच्या सजावटीच्या वस्तु, बॅग्ज इ. विविध प्रकारचे साहित्य विक्रीसाठी उपलब्ध राहणार असून यामध्ये गृहविज्ञान विभागातील आजी व माजी विद्यार्थीनी, कृषी विज्ञान केंद्र, युवा उद्योजक/उद्योजिका व बचत गटांचा सहभाग राहणार आहे.

उद्योजक मेळाव्यामध्ये ज्या उद्योजकांना स्टॉल लावावयाचा असेल त्यांना डॉ. नीता साखरकर यांचेशी दूरध्वनी क्र. ७०५७६११९९२ यावर किंवा सौ. गौरी लवाटे यांचेशी दूरध्वनी क्र. ९४२२८३६२४१ यावर संपर्क साधता येईल.

या मेळाव्यासाठी सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने भेट देवून विद्यार्थीनींचा उत्साह द्विगुणीत करावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने पदव्युत्तर गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. मनिषा काळे यांनी केले आहे.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　　दि. २७/०८/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

जनसंपर्क अधिकारी